# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-**
**{कारखाना विभाग}**

घनकचरा विभागा अंतर्गत नागपूर शहरातील रोड म.न.पा च्या व मालकीच्या २ नग ट्रक माउन्टेड मेकॅनिकल रोड स्विपर व्दारे स्वच्छता करण्याच्या कामा करीता सदर रोड स्विपरसह ऑप्रेशन व मैटन्स चे कार्य करण्याच्या कामाकरीता रु.१,५९,६३,४१८/-( रु. एक करोड एकोनसाठ लक्ष चारशे अठरा रुपये फक्त ) राशीचे प्राकलनास पद क्रमांक A४६३०१९६१७०२ अंतर्गत प्रावधान मुक्त करुन प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याचा व कामास्तव नियमित ई-निविदा बोलविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप :-**

१. या कामास्तव रु.१,५९,६३,४१८/- रक्कमेला मा. मुख्य अभियंता यांनी CE/PWD/T.S/३६A/२०२३-२४ दि.१५.०५.२०२३अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.
२. उपरोक्त प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर रितसर निविदा मागवून काम करण्यात येईल.
३. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 369/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 18/ 05 /2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, कारखाना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार घनकचरा विभागा अंतर्गत नागपूर शहरातील रोड म.न.पा च्या व मालकीच्या २ नग ट्रक माउन्टेड मेकॅनिकल रोड स्विपर व्दारे स्वच्छता करण्याच्या कामा करीता सदर रोड स्विपरसह ऑप्रेशन व मैटन्स चे कार्य करण्याच्या कामाकरीता रु.१,५९,६३,४१८/-( रु. एक करोड एकोनसाठ लक्ष चारशे अठरा रुपये फक्त ) राशीचे प्राकलनास पद क्रमांक A४६३०१९६१७०२ अंतर्गत प्रावधान मुक्त करुन प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याचा व कामास्तव नियमित ई-निविदा बोलविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**